# संयुक्त महाराष्ट्र आंबेडकरी राजकीय चळवळीचे युतीचे राजकारण

प्रा . डॉ . भगवान माने,राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**प्रस्तावना:** १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रांतिक सरकारच्या विधिमंडळात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. राष्ट्रीय काँग्रेसची विविध अधिवेशन, त्यामधील ठराव, पक्षश्रेष्ठींचे निर्णय, निवडणूक जाहिरनामे, यामधून भाषावार प्रांतरचनेची मागणी केली होती. भारतात विविध भाषा आणि प्रदेश आहेत. लोकशाही व्यवस्थेत, लोकशाही संवर्धनसाठी लोकभाषा हे माध्यम प्रभावी आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासामध्ये भाषा घटक महत्वाचा असून ज्ञान, संक्रमणाचे अनुभवजन्य आणि बुद्धीप्रामाण्य साधन म्हणून भाषेचे कार्य महत्वाचे ठरते. भाषा हे व्यक्ती – व्यक्ती, व्यक्ती – समाज, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे प्रभावी माध्यम आहे. म्हणून काँग्रेसने जाणीवपूर्वक भाषावार प्रांतरचनेचे तत्व स्विकारले होते. भाषावार प्रांत पुर्नरचनेमुळे स्वतंत्र राज्यासाठी देशाच्या विविध भागात आंदोलने आणि उठाव झाले. इंग्रज गेले परंतु फोडा आणि झोडा नितीचा काँग्रेसजनांनी भाषा या प्रभावी हत्याराचा पुरपुर वापर केला. भाषावार प्रांतरचनेमुळे भारताच्या विविध राज्यामध्ये आंदोलने झाली. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलनही त्याचा एक भाग आहे. १९५६ साली गुजरात व महाराष्ट्र यांचे मुंबईसह महाद्विभाषीक राज्य स्थापन करण्यात आले. महाराष्ट्रातील मराठी भाषीक लोक इतरत्र विखुरलेले आहेत. परंतु जो भाग महाराष्ट्र राज्याला लागून आहे तेथील लोक मराठी भाषिक आहेत असा संपूर्ण प्रदेश एकत्र करणे म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची मागणी होय. यामध्ये मध्यप्रांत, विदर्भ, मुंबई ईलाखा आणि हैद्राबाद संस्थानातील मराठवाड्यातील भागांचा समावेश होत होता. परंतु काँग्रेसपक्षाने, पंडित जवाहरलाल नेहरू व वल्लभभाई पटेल यांनी संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न भिजत ठेवून भाषा या प्रभावी हत्याराचा वापर केला.

भाषीक वादाच्या मर्यादेसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे स्पष्टीकरण देतात ''एक राज्य एक भाषा हा जगातील सर्व राष्ट्रांनी अवलंबलेला सिद्धांत होय. जर्मनी, फ्रान्स, इटली, इंग्लंड, अमेरिका देशांच्या संविधानात एक राज्य एक भाषा हाच न्याय दिसून येईल.[१]''

१९५३ च्या न्यायमूर्ती फाजलअली आयोगाने भाषावार प्रांतरचनेनुसार मंजूरी देत असताना महाराष्ट्र व गुजरातला वगळले. त्यामुळे महाराष्ट्रात मोठा असंतोष उफाळून आला. मुंबई काँग्रेसच्या वतीने संयुक्त महाराष्ट्रा संदर्भात चौपाटीवर आयोजित केलेल्या सभेत मुख्यमंत्री मोरारजी देसाई आणि स.का. पाटील यांनी मुंबई महाराष्ट्राला कधीच मिळणार नाही. असे ठामपणे सांगितल्यामुळे सभेत चप्पल आणि दगडांचा वर्षाव करण्यात आला. मोरारजी देसाई यांच्या आदेशाने पोलीसांनी आंदोलकांवर गोळीबार केला. त्याच १०५ लोक हुतात्मे झाले.

केंद्रातील काँग्रेसे नेतृत्व संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडवत नाही असे दिसू लागल्यामुळे सेनापती बापट यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यासाठी आवाहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर आंबेडकरी राजकीय पक्षाचे राजकारण विखंडीत असे राहिले. भारतातील बौद्धांच्या एकूण संख्येपैकी ८५.६२ टक्के बौद्ध लोक महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत त्यांचे प्रमाण सोडसहा टक्के असून महाराष्ट्राच्या राजकारणाचा व समाजकारणाचा विचार करता बौद्ध जनांचा कल कोणत्या पक्षाकडे आहे. याचा विचार सर्व राजकिय पक्षांना करावा लागतो. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी अस्तित्वात आलेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीशी शेड्यूलकास्ट फेडरेशनने केलेली युती महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीस कारणीभूत झालेली आहे.

प्रादेशिक पातळीवरील आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी वर्चस्वासाठी जातींनी प्रदेशवादाचा पाठपुराव केल्याचे दिसून येते. आपणच खरे प्रदेशवादी आहोत प्रादेशिकता आणि प्रादेशिक संस्कृती यांचे आपण जतन व प्रतिनिधीत्व करतो या दाव्यांचा अधिमान्यतेकरणासाठी महाराष्ट्रात मराठा समाजाने प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राच्या निर्मीतीमध्ये उच्च व मध्यम जातींचे परस्पर सहकार्य झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीने ब्राह्मण वर्चस्वाविरोधी भूमिका घेतली होती. परंतु भाषावार प्रांतरचनेमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हे दोन्ही जातीसमूह एकत्र आले. त्याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्र राज्य निर्मीतीनंतर सत्ता मराठा समाजाकडे गेली. आणि ब्राह्मण राजकारणाबाहेर फेकले गेले. परंतु दुसरीबाजू म्हणजे ब्राह्मणांना बिगर राजकीय सार्वजनिक क्षेत्रात आपले वर्चस्व टिकविणे शक्य झाले. महाराष्ट्रातील मराठा समाजाने इतर मागास जातींच्या सत्तेच्या दाव्यांचे अपहरण करून स्वत:ची सत्ता ही बहुजनांची सत्ता असल्याचा दावा केला. महाराष्ट्रात ब्राह्मण – मराठा सहकार्याचे कारण 'गुजराती – मारवाडी आणि बनियांना' प्रतिकार करण्याचा होता.

**शोध निबंधाची समस्या :**

भाषावार प्रांतरचनेनुसार मराठी भाषिकांचा महाराष्ट्रात समावेश करणे आवश्यक होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मीती करणे आवश्यक असताना, काँग्रेस श्रेष्ठींनी वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करुन महाद्विभषीक राज्याची निर्मीती केली. काँग्रेसकडून भाषीक गटांना खूष करून आपली राजकिय सत्ता बळकट करावयाची होती. परंतु संयुक्त महाराष्ट्रास काँग्रेसचा विरोध होता. संयुक्त महाराष्ट्र समितीने, शेड्यूल कास्ट फेडरेशनबरोबर युती करून काँग्रेस पक्षाचा दारूण पराभव केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्ली येथे संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांबरोबर निवडणूकांच्या डावपेचाची चर्चा केली होती. आंबेडकरी राजकिय चळवळीने मुत्सदीपणे जर राजकिय पक्षांशी युती केली तर आंबेडकरी राजकिय चळवळीला अपेक्षित यश प्राप्त होऊन राजकिय सत्ता हस्तगत करता येते ही शोधनिबंधाची समस्या आहे.

शोधनिबंधाची व्याप्ती संयुक्त महाराष्ट्र चळवळ, आणि शेड्यूल्डकास्ट फेडरेशनने केलेल्या युती पर्यंत मर्यादित आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

१. भाषावार प्रांतरचनेचे उद्दीष्ट समजून घेणे.
२. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा आढावा घेणे.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषावार पुर्नरचनेसंबंधीच्या विचारांचा आढावा घेणे.
४. संयुक्त महाराष्ट्र समिती आणि शेड्यूल कास्ट फेडेरेशनच्या युतीचा आढावा घेणे.

भाषीक राज्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

१९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केल्यामुळे बंगालमध्ये प्रादेशिक ऐक्याच्या भावना उफाळून आल्या. भाषीक तत्वांमुळे प्रादेशिक भावनेची वाढ ही विसाव्या शतकातील महत्वपूर्ण घटना होती. विविध प्रांतातील भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक प्रवाह शक्तीमान झाले होते. १९११ मध्ये मद्रास प्रांतातील आंध्र जिल्ह्यात स्वतंत्र आंध्रप्रांताच्या मागणीसाठी आंदोलन सुरु झाले. तमीळ संघामुळे अभिजीत तामीळवाङमय, साहित्य,

कलाकृती याबद्दल भाषीक अभिमान जागृत झाला याचवेळी सच्चिदानंद सिन्हा यांनी बिहारमध्ये स्वतंत्र बिहार प्रांतांची मागणी केली. ब्रिटीशांनी, मुंबई, मद्रास, आणि कलकत्ता यामोठ्या प्रेसिडेन्सी निर्माण करून अनेक भाषीक प्रदेशांना आणि भिन्न भाषीकांना एकाच नियंत्रणाखाली आणल्यामुळे प्रादेशिक भावना तीव्र होऊन स्वतंत्र प्रांताची मागणी पुढे आली. ब्रिटीशांचे फोडा आणि झोडा धोरण केवळ जातीसंबंधीचे नव्हते. तर त्यामध्ये प्रादेशिक भाषा, अस्मिता यांच्या वेगळेपणाची जाणीव होती. राष्ट्रीय आंदोलनासाठी भारतीयांनी एकत्र येऊ नये असा त्यांचा हेतू होता.

भाषीक राज्य पुनर्रचना हे काँग्रेसपक्षाचे अपत्य असून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या विविध अधिवेशनातून भाषावार प्रांतरचनेच्या तत्वासंबधी चर्चा झालेली आहे. १९२० च्या नागपूर काँग्रेस अधिवेशनात भाषेच्या तत्वावर प्रांतिक काँग्रेस कमिटी स्थापन करण्याचा ठराव संमत केला होता. काँग्रेसने आपल्या स्थानिक पातळीवरील राजकारणाचा पाया मजबूत करण्यासाठी भाषावार प्रांतरचनेचे तत्व स्विकारले होते. नागपूर अधिवेशनानंतर १९२० मध्ये मोतीलाल नेहरू आणि तेजबहादूर सप्रू समितीने भाषावार प्रांतरचनेची शिफारस केली होती. १९२१ मध्ये अहमदाबाद येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात भाषीक राज्याच्या मागणीचा ठराव संमत केला होता. १९२८ च्या मोतीलाल नेहरू समितीने भाषेवर आधारीत प्रांताची पुर्नरचना करण्याची शिफारस केली होती. ब्रिटीशांनी निर्माण केलेली प्रांतरचना किंवा प्रोव्हिन्स गव्हर्मेंट स्विकारून प्रांतिक सरकारे स्थापन करण्यात आली. त्यामुळे भाषावार राज्यांच्या मागणीने जोर धरला होता. त्याच बरोबर संस्थानिकांच्या विलीनीकरणाचा प्रश्नही बिकट झाला होता. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न सोडविण्यात आला, हैद्राबादचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण आणि संस्थानात जबाबदार राज्यपद्धती या दोन मागण्यासाठी स्टेट काँग्रेसने सुरु केलेले सत्याग्रह आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न निजामाकडून केला. त्याचा रामानंद तीर्थ यांनी निषेध केला होता.[२]

भाषावार प्रांतरचना आणि एस.के. दार समिती :

केंद्रशासनाने १७ जून १९४७ रोजी आलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली भाषावार प्रांतरचनेसाठी समिती नेमली होती. या समितीमध्ये बिहारचे जगत नारायण लाल (वकील) आणि पन्नालाल या निवृत्त आय.सी.एस. अधिकाऱ्यांचा समावेश होता. दार समितीने भाषावार प्रांत रचनेला विरोध केला होता. दार समितीच्या मते ''भाषावार प्रांतरचनेमुळे संकुचित राष्ट्रवाद निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न गंभीर होईल, त्यामुळे भाषावार प्रांत रचना स्विकारणे धोक्याचे आहे.'' दार समितीने 'मुंबई शहर' महाराष्ट्रापासून अलग ठेवण्याची शिफारस केली होती.

दार समितीने काँग्रेस अनुकूल अहवाल सादर केला नाही. भाषावार प्रांत रचनेला नकार दिल्यामुळे भाषावार प्रांत रचनेसाठी उत्सुक काँग्रेस कार्यकर्ते नाराज झाले, भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांसाठी भाषावार प्रांत रचनेचा १९४८ मधील जयपूर काँग्रेस अधिवेशनात पुनर्विचार करण्यात आला. या अधिवेशनाचे अध्यक्ष पट्टाभिसितारामय्या होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यांची समिती नेमली. जे.व्ही.पी. या नावाने ही समिती परिचित आहे. ६ एप्रिल १९४९ रोजी समितीने अहवाल प्रसिद्ध केला. त्यामध्ये असे म्हटले आहे की, भाषावार प्रांतरचनेसाठी सध्याचा काल अनुकूल नाही.'' परंतु भाषावार प्रांताच्या मागणीसाठी जनतेच्या भावना तीव्र असतील तर जनतेच्या मागणीसाठी व्यवहार्यता आजमावण्याची पंडित जवाहरलाल नेहरूंनी तयारी दर्शविली होती.

**राज्य पुर्नरचना आयोग :**

स्वातंत्र्यकाळापासून राष्ट्रीय काँग्रेस आणि इतर काही गटाकडून भाषिक तत्वांवर प्रांत निर्माण करण्याची मागणी केली जात होती. १९५३ मध्ये दक्षिण भारतात मद्रासमध्ये श्री. पोट्टी आणि श्री. रामलु यांच्या प्राणांतिक उपोषणामुळे मद्रासमध्ये हिंसाचार घडून आला. केंद्रसरकार जनतेच्या इच्छेपुढे नेमले. आणि तेलगू भाषीकांसाठी आंध्रप्रदेशाची निर्मीती झाली.[३] भाषिक राज्याचा अभ्यास करण्यासाठी केंद्रशासनाने १९५३ मध्ये राज्य पुर्नरचना आयोग नेमला. यामध्ये पंडित हृदयनाथ कुंझरू, के. एम. पण्णीकर या सदस्यांचा समावेश होता. आयोगाने १९५५ मध्ये अहवाल सादर केला. त्यावर चर्चा होऊन १९५६ साली भाषीक तत्वांवर राज्यांची किंवा प्रांतांची पुनर्रचना करण्यात आली.

**संयुक्त महाराष्ट्र :**

भाषावार प्रांत रचनेच्या तत्वावर मराठी भाषीक महाराष्ट्र राज्य निर्मीतीच्या मागणीसाठी प्रयत्न झाले आहेत. १९१७ मध्ये प्राध्यापक विठ्ठल वामन ताम्हणकर यांनी 'लोकशिक्षण' मासिकात, हैद्राबाद संस्थान, वऱ्हाड व मध्यप्रांत येथील मराठी भाषिकांचा मुलुख मुंबई राज्यातील मराठी भाषिक जिल्ह्यांना जोडावा असे म्हटले आहे.[४] १९३८ मध्ये सी.पी. बेरार प्रांताच्या विधिमंडळाचे प्रतिनिधी रामराव देशमुख यांनी सी.पी. वऱ्हाडच्या जोड प्रांतातून वऱ्हाडला वेगळे करून त्याचा एक वेगळा प्रांत करण्याचा ठराव मांडला होता. १९३८ मध्ये मुंबई येथील महाराष्ट्र संम्मेलनामध्ये वऱ्हाडसह महाराष्ट्राचा एकभाषी प्रांत बनवावा आणि निजामाचे हैद्राबाद संस्थान खालसा झाल्यानंतर मराठवाडा, आणि पोर्तुगीजांची सत्ता संपुष्टात आल्यानंतर गोमंतक (गोवा) हे प्रदेश एकभाषी प्रांतात सामील करण्याची मागणी केली होती. १९३९ मध्ये नगर येथील साहित्य संम्मेलनात सर्व मराठी भाषीकांचा एक प्रांत बनवून 'संयुक्त महाराष्ट्र' नाव देण्यात यावे असा ठराव संमत करण्यात आला होता. तसेच १९४० मध्ये रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे 'संयुक्त महाराष्ट्र सभा' स्थापन केली होती.

१२ मे १९४६ रोजी बेळगाव येथील मराठी साहित्य संम्मेलनात संम्मेलनाचे अध्यक्ष ग.त्र्य. माडखोलकर यांनी 'संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव मंजूर केला होता. बेळगावच्या साहित्य संम्मेलनात 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' स्थापन करण्यात आली. समितीच्या सदस्यांमध्ये प्रा. दत्तो वामन पोतदार, शंकरराव देव, केशवराव जेधे, श्री. श. नवरे, ग. त्र्य. माडखोलकर यांचा समावेश होता. २८ जुलै १९४६ रोजी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे महाराष्ट्र एकीकरण परिषद स्थापन करून मराठी भाषीकांच्या एका प्रांताची मागणी केली होती. ८ ऑगस्ट १९४७ च्या अकोला करारानुसार 'संयुक्त महाराष्ट्र' निर्माण करणे अशक्य असेल तर महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत निर्माण केला जाईल असा ठराव संमत करण्यात आला.

महात्मा गांधीजींचा महाराष्ट्र स्थापनेस विरोध आणि काँग्रेसचे दुट्प्पी धोरण

१९४२ साली ग. त्र्य. माडखोलकर यांनी महात्मा गांधीजींशी केलेल्या पत्रव्यवहारात संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेला पाठिंबा दिलेला होता. परंतु मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करण्यास महात्मा गांधीजींनी विरोध केला होता. मात्र भाषावार प्रांत रचनेला महात्मा गांधीजींचा पाठिंबा होता. भाषावार प्रांत रचना व्हावी असे त्यांनी अनेकवेळा बोलून दाखविले होते. २५ जानेवारी १९४८ रोजीच्या लेखात महात्मा गांधीजी असे म्हणतात की, ''भाषेच्या तत्वावर प्रांताची पुर्नरचना करण्याचा आणि स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर या प्रांताना घटनात्मक स्वरूप देण्याचा काँग्रेसचा सिद्धांत असल्याचा त्यांनी स्पष्ट

केले आहे.''[५]

**राज्य पुर्नरचना आयोग :**

भाषावार राज्याच्या निर्मीतीचा फेरविचार करण्यासाठी केंद्रसरकारने न्यायमूर्ती फाजलअल्ली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुर्नरचना आयोग नेमला होता. त्यामध्ये पंडित हृदयनाथ कंझरु आणि सरदार पण्णीकर यांचा समावेश होता. १९५५ मध्ये आयोगाने भाषीक प्रांतांची राज्ये निर्माण करण्याचे सुचविले होते.

राज्य पुनर्ररचना आयोगाच्या स्थापनेनंतर शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे कार्य पुन्हा जोमाने सुरु केले. परंतु फाजल अली आयोगाने वऱ्हाड प्रांत वगळता, महाराष्ट्र, गुजरात यांचे विशाल द्वैभाषिक राज्य निर्माण व्हावे असे मत व्यक्त केले होते. मराठी भाषीक जनतेला हा निर्णय मान्य नव्हता. मुंबई शहराचा प्रश्न महाराष्ट्र व गुजरात राज्याच्या निर्मीतीस अडथळा ठरत होता. मुंबई हे व्यापाराचे आणि औद्योगिक केंद्र महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांच्या स्वाधीन करणे गुजराती नेत्यांना मान्य नव्हते. त्यामुळे महाराष्ट्र व गुजरात यांचे विशाल द्विभाषिक राज्य निर्माण करण्यात आले. केंद्रातील काँग्रेस नेतृत्वाने महाराष्ट्राला नेहमीच सापत्न वागणूक दिली. आणि अखेर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन भाषीक राज्ये अस्तित्वात आली.

महाराष्ट्र राज्य मुंबईसह प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेची शिवाजीपार्कवर मोठी सभा आयोजित केली होती. या सभेत यशवंतराव चव्हाणांचे गोडवे गायिले जात होते. या अनुषंगाने कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या अनुषंगाने आणि काँग्रेसने या लढ्याचे श्रेय आपल्याकडे घेण्यामध्ये दाखविलेल्या कौशल्याबद्दल ते असे म्हणतात, ''यशवंतराव चव्हाण यांनी फक्त दाईचे काम केले. या पलिकडे काही केले नाही. संयुक्त महाराष्ट्र समितीद्वारे, महाराष्ट्राची निर्मीती आहे. १०५ बळी आमचे गेले आमच्या अथक प्रयत्नांमुळे मंगल कलश आला. नामदार यशवंतराव चव्हाण यांनी फक्त दिल्लीहून कलश आणण्याचे काम केले.[६]''

आंबेडकरी राजकीय चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

सामाजिक परिवर्तनाची महान चळवळ म्हणून आंबेडकरी राजकिय चळवळीकडे पाहिले जाते, शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा हे चळवळीचे ब्रीद वाक्य आहे. आंबेडकरी राजकिय चळवळीचे प्रेरणास्थान तथागत गौतमबुद्ध असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार चळवळीचा पाया आहे. महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, पेरीयर रामस्वामी, महात्मा बसवेश्वर, संत कबीर या थोर पुरूषांचा महान वारसा चळवळीला लाभला आहे. आंबेडकरी चळवळीचे स्वरूप केवळ राजकिय नसून, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आहे. दलित साहित्य, दलित पँथर्स, दलित मुक्ती सेना, आत्मसन्मान चळवळी ह्या आंबेडकरी चळवळीची अपत्ये आहेत. सामाजिक चळवळीच्या अभ्यासातून असे दिसून येते की, सामाजिक चळवळीतील सामूहिक सहभाग आणि आंतक्रिया जेवढी अधिक असते त्या प्रमाणात चळवळीला यश प्राप्त होते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळीचा अभ्यास आणि वास्तव हे सुद्धा चळवळीतील आदान प्रदान प्रक्रियेवर अवलंबून असल्याचे दिसून येते. राजकिय पक्षाचा प्रभाव राजकिय पक्षाचे नेतृत्व, सभासदांचा सहभाग, राजकिय पक्षावर असणारी निष्ठा, पक्षनेतृत्वाची शिस्त, वेळोवेळी बदलत्या परिस्थितीनुसार आखलेले डावपेच, युती किंवा आघाडीचे राजकारण यावर अवलंबून असते. सामाजिक चळवळीप्रमाणे राजकिय चळवळीसुद्धा स्थिर नसतात. त्यावरही नव्या आवर्तन–प्रवर्तनाचा बदल होतो. परंतु आंबेडकरी राजकीय चळवळीमध्ये भविष्यकालीन सर्व डावपेचांची आखणी केल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक हक्काबरोबर राजकिय हक्काचा आग्रह धरलेला होता. गोलमेज परिषदेला जाण्यापूर्वी ऑगस्ट १९१९ मध्ये नागपूर येथील 'अखील भारतीय दलित परिषदेत आपले राजकिय विचार व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले आहे की, '' एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर हुकुमत गाजवू नये, या काँग्रेसच्या मताशी मी सहमत आहे. परंतु नुसते एवढेच मान्य करून चालणार नाही; समाजातील एका वर्गाने दुसऱ्या वर्गावरही सत्ता गाजवता कामा नये हे देखील या ठिकाणी मला स्पष्ट बजवायचे आहे.[७]''

स्वांतंत्र्यपूर्वकाळात कायदेमंडळात अस्पृश्यांच्या प्रतिनिधीत्वासंबंधी विचार केलेला नव्हता. १९२१–१९२३ मध्ये पहिले कायदेमंडळ अस्तित्वात आले होते. १९२४–१९२५ मध्ये गव्हर्नर जनरलने हिंदुस्थानातील कायदेमंडळाच्या निवडणूकांत वाढ केल्याने 'स्वराज्य' पक्षाने निवडणूकीत भाग घेतला होता. त्यानंतर १९२७–१९३० मधील तिसरे कायदेमंडळ, १९३२–१९३४ मधील चौथे कायदेमंडळ आणि २० मे १९३४ मधील पाचव्या कायदेमंडळात 'अस्पृश्य समाजाच्या प्रतिनिधीत्वाचा गांभीर्याने विचार झाला नव्हता. किंवा अस्पृश्य समाजाला राजकिय हक्कासाठी काँग्रेस नेत्यांनी केंव्हाही आग्रह धरलेला नव्हता.' मात्र काँग्रेसने स्वांतत्र्य लढ्याचे नेतृत्व करीत असताना प्रांतिक सरकारमध्ये आपले प्रतिनिधी पाठविले होते. १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत काँग्रेसने एकतर्फी निवडणूक जिंकली होती. काँग्रेसने एकतर्फी निवडणूका जिंकल्या तर भविष्याच्या दृष्टीने लोकशाहीवर घातक परिणाम होईल. विधिमंडळात काँग्रेसपक्षावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि विरोधी पक्षाची भूमिका पार पाडण्यासाठी, अस्पृश्य समाजाच्या कायदेमंडळातील प्रतिनिधीत्वासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकिय पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला होता.

**स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना :**

स्वातंत्र्यानंतर देशातील अस्पृश्य समाज, कामगार, मजूर, कष्टकरी जनतेचे कायदेमंडळात प्रतिनिधीत्व व्हावे या उद्देशाने १९३६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूरपक्षांची स्थापना केली. भारतातील वरिष्ठ आणि कनिष्ठ जातीतील सर्व मजूर आणि कामगार एकत्र येऊन काँग्रेसला विरोध करतील अशी त्यांची सिद्धांत कल्पना होती. स्वतंत्र मजूर पक्षाच्या स्थापनेत आयु. दादासाहेब गायकवाड, डी. व्ही. प्रधान, अनंतराव चित्रे, सुरबा नाना, टिपणीस, कद्रेकर, आर. आर. भोळे यांचा महत्वाचा वाटा होता.

स्वतंत्र्य मजूर पक्ष आणि मुंबई विधानसभेतील युतीचे राजकारण :

१९३५ च्या कायद्यानुसार स्वतंत्र्य मजूर पक्षाने लढविलेल्या निवडणूकीत स्वतंत्र मजूर पक्षाने १८ जागा जिंकल्या होत्या. मुंबई विधानसभेत स्वतंत्र मजूर पक्ष हा मोठा पक्ष होता. आणि विरोधी बाजूला 'मुस्लीम लीग' हा सर्वात मोठापक्ष होता. स्वतंत्र मजूर पक्षाचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. उपनेते आर. आर. भोळे होते तर मुस्लीम लिगचे नेते सर देहलवी होते. क्रिप्स योजनेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर नेत्यांची भूमिका सोडून दिली. भातीय संविधानात अस्पृश्य समाजाच्या न्याय, हक्क आणि स्वातंत्र्यासाठी, संविधानसभेत प्रतिनिधीत्व व्हावे यासाठी १९४२ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाचे विसर्जन करून ऑल इंडिया शेड्यूल कास्ट फेडरेशनची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीवर आधारीत पक्षाची स्थापना केली. या अनुषंगाने चा.भ. खैरमोडे असे म्हणतात की, ''१९३७ सालानंतर जातीयवादी राजकारणाने धुमाकुळ घातला होता.

त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जातीयवादाचा मार्ग स्विकारणे अटळ होऊन बसले.८'' अस्पृश्यतेचा कलंक नाहीसा करणे, अस्पृश्यांना भावी संविधानात स्थान देणे आणि राष्ट्रीय काँग्रेसवर प्रभाव पाडणे हा मुख्य उद्देश होता. ११ मार्च १९४६ साली झालेल्या सार्वत्रीक निवडणूकीत ऑल इंडिया शेड्यूल कास्ट फेडरेशनने भाग घेतला होता. परंतु काँग्रेसने जातीयवादी पक्ष असा प्रचार केल्याने, तसेच अस्पृश्यांसाठी संयुक्त मतदारसंघ ठेवल्यामुळे सवर्ण हिंदूंनी अस्पृश्य उमेदवारांना मतदान केले नाही. या निवडणूकीत पक्षाचा दारूण पराभव झाला.

१९५२ च्या निवडणूकीत सुंयक्त मतदारसंघाऐवजी राखीव मतदार संघातून निवडणूका घेण्यात आल्या. परंतु काँग्रेस पक्षाने शेड्यूलकास्ट फेडरेशन पक्षाला रोखण्यासाठी राखीव मतदारसंघातून अनुसूचित जाती–जमातीचे उमेदवार उभे करून मतविभागणी केल्याने शेड्युलकास्ट फेडरेशन पक्षाच्या उमेदवारांचा पुन्हा पराभव झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई महाराष्ट्राची आहे. भारतातील सर्व भाषिक प्रांतात महाराष्ट्र हा प्रांत दुर्दैवी आहे. महाराष्ट्रात इतरांकडून नागवला गेला. सर्वांनी महाराष्ट्रीयांचे यथेच्छ दमन केले. महाराष्ट्रात गुजराथी मारवाड्यांचे अबाधित वर्चस्व आहे. मुंबई ही महाराष्ट्राची आहे. असा युक्तीवाद करताना असे म्हणतात, ''मद्रासमध्ये आंध्रप्रदेशच्या हातात ३० टक्केहून अधिक व्यापार आहे. इतरांच्या मानाने आंध्राची लोकसंख्याही जास्त आहे. पण इतके असूनही भौगोलिक दृष्टीने मद्रास आंध्रला मिळाले नाही. तसेच कलकत्यावर बंगाली खेरीज आसामी उरिया परप्रांतियांचे आर्थिक वर्चस्व आहे. तेथे बंगाली बाबू निव्वळ कारकूनी मोलमजूरी करतात असे असताना कलकत्ता बंगालचाच आहे मग मुंबई ही महाराष्ट्राची नाही असे म्हणणे आंधळेपणाचे व अन्यायाचे आहे.९''

**संयुक्त महाराष्ट्र आणि शेड्यूलकास्ट फेडरेशनचे युतीचे राजकारण**

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना सहभागी होण्यासाठी आचार्य अत्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भेटायला गेले असतानाचे वर्णन त्यांनी पुढील प्रमाणे केलेले आहे. ''त्या दिवशी संध्याकाळी सहा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भेटावयास मी एकटा गेलो. बाबासाहेब जुन्या दिल्लीत अलिपूर रोडवर राहत असत. दिल्लीला निघण्यापूर्वी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधी एक सविस्तर पत्र मी बाबासाहेबांना लिहीले होते. त्यात त्यांच्या नेतृत्वाची आणि सहकार्याची विनंती मराठी जनतेच्या वतीने मी त्यांना केली होती. सुंयक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये एक मोठे वैगुण्य होते. महाविदर्भ आणि मराठवाड्यामध्ये अस्पृश्य जनतेचे महाराष्ट्राच्या कायदेमंडळातील प्रमाण अनुक्रमे २५% आणि २०% होते. २८० जागांपैकी ५५ ते ६० जागा अस्पृश्यांसाठी राखीव होत्या. म्हणून अस्पृश्य जनतेचे सहकार्य मिळाल्यावाचून आगामी निवडणूका संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना जिंकता येणार नाहीत ही अगदी काळ्या दगडावरची रेघ होती. ह्या दृष्टीने संयुक्त महाराष्ट्राच्या एकजुटीत शेड्युलकास्ट फेडरेशनचे सहकार्य मिळावे ही सर्वात महत्वाची आहे असे मला वाटे. म्हणून त्याबाबत बाबासाहेबांचा काय अभिप्राय आहे. हे मला समजावून घ्यावयाचे होते.१०

भाषीक प्रांतरचनेमुळे प्रांता प्रांतामध्ये मतभेद निर्माण होतील, अस्पृश्य किंवा दबलेल्या समाजाच्या विरोधी भावना वाढीस लागतील आणि प्रांताच्या राजकारणामध्ये उच्च जातीचे प्राबल्य वाढले जाऊन अस्पृश्य समाजाला सत्तेच्या राजकारणाच्या परिघाबाहेर रहावे लागेल अशी शंका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आली होती आणि ती रास्तही ठरली आहे. यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. भाषीक प्रांतरचनेद्वारे काँग्रेसपक्षाने आपली सत्ता बळकट करण्याचे धोरण अवलंबिले होते. प्रांताच्या सत्तेमध्ये काँग्रेसपक्षाला रोखण्याचे कार्य महत्वाचे होते. म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीचे एस.एम. जोशी, श्रीपाद डांगे, प्रल्हाद केशव अत्रे, दत्ता देशमुख, यांनी दिल्ली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेऊन शेड्यूल कास्ट फेडरेशनने संयुक्त महाराष्ट्र समितीशी युती करून काँग्रेसला सत्तेपासून रोखण्यासाठी आणि महाराष्ट्राला मदत करण्यासाठी युतीची विनंती केली होती. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, ''महाराष्ट्रावर होत असलेला अन्याय दूर करण्याबाबत जे लढे दिले जातील, त्यात माझा पक्ष सदैव सामील राहील.११''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी चर्चा केल्यानंतर शेड्यूल कास्ट फेडरेशनने संयुक्त महाराष्ट्र समितीशी पुढील अटीवर युती केली होती.

१. संयुक्त प्रांतातील सर्व सर्व राखीव जागा शेड्यूल कास्ट फेडरेशन मार्फत लढविल्या जातील.
२. संयुक्त महाराष्ट्र समितीने शेड्यूल कास्ट फेडरेशनचे उमेदवार खुल्या जागेवर उभे करून निवडून आणले पाहिजेत.
३. शेड्यूल कास्ट फेडरेशनने आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवून संयुक्त महाराष्ट्र समितीला सहकार्य करेल.
४. संयुक्त महाराष्ट्र समितीने काँग्रेस विरोधी पक्ष म्हणून भविष्यात कार्यरत रहावे. काँग्रेसशी युती किंवा संधान बांधू नये.
५. खेड्यातील अस्पृश्य समाजावरील अन्याय, निवारण, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकिय आर्थिक विकासाबाबत संयुक्त महाराष्ट्र समिती सदैव प्रयत्न करील.१२

**शेड्यूल कास्ट फेडरेशन व संयुक्त महाराष्ट्र समितीचे १९५७ निवडणूकीतील यश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ मध्ये महानिर्वाण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या युतीच्या राजकारणाची फलश्रुती त्यांना पाहता आली नाही. परंतु १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत दादासाहेब गायकवाड यांच्या कुशल नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली १९५७ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूका लढविण्यात आल्या. या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीचा एक घटकपक्ष म्हणून शेड्यूल कास्ट फेडरेशनने अटीतटीने निवडणूकांत भाग घेतला. त्यामुळे शेड्यूल कास्ट फेडरेशनचे १३ उमेदवार विधानसभेत निवडून गेले. आंबेडकरी राजकिय चळवळीतील युतीचे मोठे यश म्हणून याचा उल्लेख करावा लागेल.

१९५६ ते १९६० चा कालखंड :

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या कालखंडातील आंबेडकरी राजकिय चळवळीच्या युतीचा किंवा आघाडीचा मुद्दा महत्वाचा मानला जातो. दादासाहेब गायकवाड यांनी १९५७ च्या प्रांतिक सरकारच्या कायदेमंडळात संयुक्त प्रांतात महाराष्ट्र एकीकरण समितीशी शेड्यूल कास्ट फेडरेशनची युती केल्यामुळे १३ उमेदवार निवडून आले. या निवडणूकीत काँग्रेसच्या दारूण पराभव झाला. १९५६ ते १९६० चा कालखंडात महाराष्ट्रातील राजकारण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने ढवळून निघाले होते. महाराष्ट्रातील राजकारणात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे आणि मराठा समाजाचे वर्चस्व वाढलेले दिसून येते. १९५९ मध्ये दादासाहेब गायकवाड यांनी काँग्रेस विरोधी भूमिका घेऊन रिपब्लिकन पक्षाचा वेगळा गट केला होता.

१९६० ते १९६२ या दोन वर्षाच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणाची धुरा मराठा समाजाचे आणि काँग्रेसचे नेते यशवंतराव चव्हाण

यांच्याकडे होती. १९६० च्या निवडणूकीत ७५ टक्के तिकीट वाटप मराठा समाजासाठी करण्यात आले. १९६२ ते १९६३ मध्ये मारूतराव कन्नमवार यांनी मुख्यमंत्र्यांची जबाबदारी पार काडली. १९६२ च्या विधानसभेत 'संयुक्त महाराष्ट्र समितीने विरोधी पक्षाची भूमिका पार पाडली होती. परंतु अंतर्गतवाद आणि संघर्षामुळे १९६३ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीचे विसर्जन करण्यात आले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषावार प्रांतरचना आणि संयुक्त महाराष्ट्राविषयीचे विचार**

भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विरोध होता. भाषेच्या आधारे प्रांतांची रचना करावयाचे ठरले तर मुंबई शहर महाराष्ट्रापासून वेगळे करता येणार नाही. अशी भूमिका दार आयोगत सादर केलेल्या ज्ञापनात त्यांनी मांडली होती.

महाराष्ट्राचा एक प्रांत करण्याऐवजी विदर्भ आणि महाराष्ट्र असे दोन प्रांत करावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. महाराष्ट्र प्रांत अस्तित्वात आला तर काय होईल या विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''माझ्या जमातीला मराठा लोकांशी झगडावे लागेल आता ब्राह्मणांशी आमचा तंटा उरला नाही. ब्राह्मण संपले. इतके दिवस ब्राह्मणांच्या हाती असलेली सत्ता आता तुम्हां मराठ्यांच्या हाती चाललेली आहे. मराठ्यांच्या खालोखाल जर कोणती जमात महाराष्ट्रात असेल तर ती आमची. म्हणून सत्तेसाठी जो झगडा यापुढे व्हायचा तो महार व मराठे यांच्यामध्ये होईल.[१३]''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या पुर्वीच्या भाषावार राज्य पुर्नरचना विचारात बदल केल्याचे दिसून येते. भाषिक राज्यपुनर्रचनेची मिमांसा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, या मोठ्या हिंदी भाषीक राज्यांचे विभाजन करावे आणि दक्षिण भारतावरील उत्तर भारताचे वर्चस्व थोडेतरी कमी करावे.[१४]''

राज्यपुर्नरचना मंडळाने राज्यांचे असमान वाटप केले. या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, उत्तरेचे संलग्नीकरण आणि दक्षिणेचे द्वीपकल्पीकरण करून भाषीक समस्येऐवजी राजकीय पेचप्रसंग निर्माण केला गेला आहे. हे राज्य पुर्नरचना मंडळाच्या लक्षात आलेले नाही. हा पेचप्रसंग टाळण्यासाठी आत्ताच उपाययोजना केली गेली नाही तर ते राजकीय मुत्सद्देगिरीला शोभण्यासारखे नाही.[१५]

मुंबई शहर महाराष्ट्राचे असले तरी त्याचे स्वतंत्र शहर राज्य करावे आणि उर्वरीत महाराष्ट्राची पश्चिम महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र आणि पूर्व महाराष्ट्र अशी तीन राज्ये करावी. मुंबईचे शहर राज्य न म्हणता महाराष्ट्राचे शहर राज्य असे नामकरण करावे. विशेषत: मराठवाडा, या शैक्षणिक व औद्योगिकदृष्ट्या अविकसित प्रदेशाचे संयुक्त महाराष्ट्रात काय होणार याची त्यांना चिंता वाटत होती. तसेच मराठी भाषीकांचे राज्य निर्माण होण्याऐवजी मराठा जातीचे राज्य अस्तित्वात येईल असा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता.[१६] आणि तो रास्तही ठरल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. महाराष्ट्र राज्य स्थापनेमध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे योगदान महत्वाचे असून काँग्रेसने फक्त श्रेयवाद घेतला.
२. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून काँग्रेस धार्जिण्या मराठी नेतृत्वाचा विकास झाला.
३. संयुक्त महाराष्ट्र समिती व शेड्युलकास्ट फेडरेशनने मुंबई प्रांतिक कायदेमंडळात काँग्रेसचा दारुण पराभव केला. त्यामुळे केंद्रीय नेतृत्वाने द्विभाषिक राज्याऐवजी मराठी भाषिक राज्यास मान्यता दिली.
४. आंबेडकरी राजकीय चळवळीने बदलत्या राजकिय पर्यावरणाचा विचार करून युती केल्यास जागा जिंकता येतात हे सिद्ध होते.
५. संयुक्त महाराष्ट्र समिती आणि शेड्युलकास्ट फेडरेशनचा महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीनंतर राजकीय प्रभाव संपला.

संदर्भ सूची –


१. आंबेडकर डॉ. बी. आर. अनुवाद. वि. तु. जाधव:भाषिक राज्य पुनर्रचना मीमांसा प्रकाशक वाय. बी. आंबेडकर बुद्धभूषण प्रिंटींग प्रेस पृ. ०९
२. फडके य. दि : विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड सहावा – १९४८–१९६०मौज प्रकाशन खटाववाडी गिरगावमुंबई ४०० ००४ पहिली आवृत्ती १८ जून २००७ पृ. १३
३. Gupta D.C.:Indian Govt and Politics (1947-1981)Vikas Publication House Pvt. Ltd.Fifth Revised Edition - 1982 PP. 566
४. माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्रराज्यमंत्रालय, मुंबई:लोकराज्य, १ मे. १९८५ खासदार हुसेन दलवाई यांच्या लेखनातून पृ. १२७
५. माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्रराज्यमंत्रालय, मुंबई:लोकराज्य, १ मे. १९८५ खासदार हुसेन दलवाई यांच्या लेखनातून पृ. १२७
६. वाघ विलास (संपा):सुगावा मासिक सप्टेंबर २००९५६२, सदाशिव पेठ, चित्रशाळा इमारत पुणे ४११०३० सप्टेंबर २००९ पृ. १५
७. एलिनार झेलियट:डॉ. आंबेडकरांचे राजकिय विचार अमृत महोत्सव समितीद्वारा प्रकाशित प्रबुद्ध भारत विशेषांकदि. १४ एप्रिल १९६६ पृ. ७७
८. खैरमोडे चां.भ.:डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र ग्रंथ पृ. ७
९. गांजरे मा. फ.:डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे अशोक प्रकाशन, प्रबुद्धनगर नागपूर इ. खंड. ६ पृ. १००९
१०. अत्रे प्र.के.:कऱ्हेचे पाणी खंड ५ वा पृ. २३०
११. कापडे दिपकराज:संयुक्त महाराष्ट्र चळवळीत दादासाहेब गायकवाड यांचे योगदान सुगावा, सप्टेंबर २००९ पृ. १५
१२. परदेशी प्रतिमा:यौद्ध जनसत्याग्रही पृ. ५८
१३. फडके य. दि.:विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड सातवा १९४८ ते जानेवारी १९५६ पृ. १४
१४. Education Department Government of Maharashtra Ambedkar Maharashtra 1979 :Dr. Babasaheb writings and speeches Vol. 1 pp. 170
१५. आंबेडकर डॉ. बी. आर. (अनुवाद जाधव वि.तु.):भाषीक राज्य पुर्नरचना मिमांसा पृ. १७
१६. Education Department Govt. of Maharashtra1979:Dr.Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol. 1 pp. 152-155